(9)

U.G.C. डॉ. माधवी खरात 'नाशिक जिल्ह्यातील बौध्द लेण्यांचा Minar Research Project सामाजिक सांस्कृतिक, वाङ्‌मयीन अभ्यास.' 2013-2015 - F. No 23-304

## Summary of the Finding

भारताला प्राचीन परंपरा आहे, राजा अशोकाच्या कालापासून शिलालेख स्तूप उभारण्याची परंपरा निर्माण झाली, आणि काळाच्या पोटात गडप झालेल्या संस्कृतीचा लसलसता पट्टा बाहेर आला. या शिलालेख ताम्रपट, नाणी इ. मुळे प्राचीन संस्कृती समाजस्थिती आणि वाड्:मयाचे अवशेष समजण्यात मदत झाली. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करताना प्रथम ग्रंथालय, तज्ञ व्यक्तीच्या मुलाखती इ. संपर्क साधला. त्रिरश्मी लेणीची पार्श्वभूमी समजून घेवून, त्यानंतर नाशिकला भेट देवून, लेण्याची पाहणी करण्यात आली त्याचवेळी कार्ले, भाजे, कान्हेरी, बेडसे,एलिफंटा या लेण्यानां भेट दिली, त्यामुळे नाशिकच्या लेणीबद्दलची आधिक माहिती मिळवता आली. डॉ. महेश देवकर ,डॉ.धडफळे, डॉ. रूपा कुलकर्णी, डॉ. अतुल भोसकर,तसेच काही अभ्यासकांच्या भेटी घेण्यात आल्या यातून नाशिक लेण्याबाबत आधिक माहिती मिळविण्यात आली. या सर्व बाबींमधून पुढील दुवे हाती आले. १)भूगर्भ व प्रस्तरशास्त्राचा अभ्यास केलेला प्रशिक्षित करागीर वर्ग होता हे स्पष्ट होते. २)लेण्यांच्या शोधकार्यात बौध्द भिक्खुंचाही महत्त्वाचा वाटा होता. राजा अशोकानं बौध्द धर्माचा सर्वत्र प्रसार केला त्यामुळे नंतर बौध्द धर्म राजाश्रय लाभल्याने तो श्रेष्ठ ठरला अनेक राजांनी बौध्द धर्म स्वीकारला. राजा अजातशत्रुने संगिनी – म्हणजे बौध्द धर्माबाबत चर्चा चिकित्सा करणारी, विदवानांची बैठक बोलावली मात्र राजा, जिथे भिक्खू राहत तिथे म्हणजे, गुहेत आला व संगिनी सूरू झाली. भिक्खूना गुहा ध्यानधारणेसाठी सोयिस्कर वाटली व त्यातून पुढे लेण्यांच्या वाढीला गती प्राप्त झाली. ३)नाशिकमधील लेणीचा कालावधी साधारण इ.स.पूर्व ३रे शतक ते इ.स ३रे शतकापर्यंत असावा. गुप्तकाळानंतर बौध्द लेण्यांना उत्तेजन मिळाले नाही.४)लेण्यातून तृतकालीन सामाजिक सांस्कृतिक वाड:मयीन जीवनावर प्रकाश पडतो. तृतकालीन समाज हा कला वाड:मय, शास्त्र, तत्त्वज्ञान व्याकरण क्रीडा इ. प्रगत होता. नृत्य, नाटय, चित्र, शिल्प इ. कलांना उत्तेजन, विदवान श्रेष्ठी बौध्द, जैन भिक्षू, ऋषीमूनी यांना श्रेष्ठ स्थान, जुन्या प्राचीन ग्रंथाचे पाठांतर केलेल्या शिष्यनां प्रोत्साहन, तक्षशीला नालंदा सारख्या विद्यापीठांचा भारत भर प्रभाव त्यातून वाड:मयाला उत्तेजन ५) राजा अशोकांच्या कालखंडात बौध्दर्धमाचा प्रसार झाला बौध्दविद्यापीठांना अनुदान, विविध ठिकाणी स्तूपांची उभारणी (८४,०००) उभारणी, देशोदेशी, बौध्दप्रचारक पाठवणे, बौध्द अभ्यासकांना, सुविधा देणे, तसेच कलाकरांना, मोठयाप्रमाणात उत्तेजन देण्यात आलेले होते समाजाच्या अवर्ण म्हटल्य गेलेल्या वर्गातीले हे लोक असल्याने बुध्दाच्या समता तत्त्वाचा परिणाम झालेला होता. त्यामुळे उत्कट भावनेने शिल्पनिर्मितीला प्राधान्य देण्यात आले. ६)सातवाहनांच्या कालखंडात आर्थिक सुबत्ता होती त्यामुळे व्यापाऱ्याकडून लेण्यानां आर्थिक साह्य ७) सामाजिक वातावरण, सर्व धर्माला पोषक, ज्ञान, विज्ञान, विदवानांचा आदर सत्कार, ज्ञानाला महत्त्व कलेला प्रोत्साहन इ. मुळे एकूणच नाशिकमधील त्रिरश्मी लेणीचा विकास झाला आहे.

भारतीय लेण्याचां अभ्यास हा एक आव्हानात्मक प्रकल्प होता. भारतीय लेण्यांची संख्या १००० ते १२०० च्या आसपास आहे. काळाच्या ओघात अनेक लेण्या नष्ट झाल्या, तर काही तुटलेल्या अवस्थेत समोर येतात. या लेण्याची पडझड अनेक शतकांचे दुर्लक्षित्व, निसर्गाचा, वारा, पाणी, पाऊस, उन इ. होणारा परिणाम इ. विचार करता या लेण्याच्या काळाबद्दल अनेक विदवानांच्या मतांमधे, विविधता आढळते. नाशिकमधील लेण्यांचा अभ्यास करताना हे जाणवले मात्र लेण्यातील शिलालेखांमुळे, लेण्याच्या रचनाकाळ व्यक्त करता येवू शकतो त्यादृष्टीने पहाता – १) – लेणी क्र. ३ मधील गौतमीपूत्राच्या आईने सातवाहन बलश्रीने, गौतमीच्या पराक्रमाचे दातृत्व– कर्तृत्त्वाचे शिलालेखातून मोठेपण वर्णिला आहे. तसेच, अनेक शिलालेखातील उल्लेखावरून इ. स.पूर्व ३रे शतक ते. इ.स.३रे शतक असा ६०० वर्षाचा कालखंड लेण्यांच्या निर्मितीचा आहे हे स्पष्ट होते. सातवाहन क्षात्रप राजांच्या काळखंडात ही लेणी खोदलेली आहे. २) लेण्यामधील मूर्त्या हया, सर्व भगवान बुध्दाच्या आहेत. अखंड कातळातून त्या कोरलेल्या असून, रक्षक, प्राणी काही लोकजन व पानाफुलांची कलाकुसर इ. वैविध्य त्यातून जाणवते, तत्कालीन शिल्पकला, प्रगत अवस्थेत होती. भूगर्भ व प्रस्तर शास्त्राचा अभ्यास केलेला प्रशिक्षित कारागीर वर्ग होता.भारतीय वास्तूकलेला ५००० वर्षांची प्रदीर्घ परंपरा आहे. स्तूप, विहार, चैत्यगृहे बांधून शिल्पकरांनी आपल्या कलेचे दर्शन घढविलेले आढळते–३)कलेच्या मूलतत्त्वाचा विचार केलेला आढळतो. आकारदर्शन बिंदू, रेषा, पृष्ठभाग पोतदर्शन –दगडाचा पोत रंग आणि अवकाश दर्शन घनना, अवकाश, खोली – उंची इ. विचारात घेऊन, ही शिल्पाकृती खोदलेली आढळते. हया ही सर्व लेण्यातून तत्कालीन सामाजिक सांस्कृतिक जीवनाचा बोध होतो. तत्कालीन समाज लेखन, वाचन, मनन, चिंतन इ. द्वारे वाङ्‌मयीन व्यवहार करीत होता हे स्पष्ट होते. ही सर्व शिल्पाकृती छायाचित्राद्वारे जतन करून भावी पिढीसाठी राखणे, इतकेच नव्हे तर लेण्यांच्या संवर्धनासाठी, आधुनिक विकसित तंत्राचा वापर करणे ही गरज जाणवली व अभ्यासाचे उद्दिष्टय पूर्ण झाले.

U.G.C. MRP

(3)

प्रा. डॉ. माधवी खरात,
नाशिक जिल्ह्यातील बौद्ध लेण्यांचा
सामाजिक, - सांस्कृतिक वाङ्मयीन अभ्यास

नाशिकमधील बौध्द लेण्यांच्या अभ्यासांचे महत्त्व, सामजिक, संस्कृतिक, वाङ्:मयीन दृष्टया महत्त्वाचे ठरते. त्यातून १) सामाजिक नित्तिमतेचे शिक्षण २) हाजारो वर्षांपूर्वीच्या प्रगत तंत्राचा विचार करता, अलिकडील तंत्रज्ञानासाठी ते पोषक ठरते ३) नेवारी, गांधारी, ब्राम्ही लिपीची तत्कालीन प्रगती पाहता या लिपीचा नव्याने अभ्यास करणे सामाजासाठी आवश्यक ४) तत्कालीन प्राकृत भाषा, शौर्यसेनी, पैशाची, अर्धमागधी, या भाषांतील साहित्य उपलब्ध होण्यासाठी या भाषांच्या अभ्यासाची आवश्यकता ५) बौध्द साहित्य, नव्याने उपलब्ध होण्यासाठी प्राचीन भाषा लिपी यांचा अभ्यास होणे आवश्यक ६) या लेण्यांच्या अभ्यासातून नविन पिढीला, भारतीय संस्कृतीच्या, कला, शास्त्र, वाङ्:मय, सामाजिक, सांस्कृतिक बाबींची ओळख होवून त्या अभ्यासास प्रेरणा मिळेल. ७) सर्जनशील कलेचे होणारे दर्शन उच्च अशा अध्यात्म्याच्या पातळीवरचे असल्याने, सामाजिक उच्चनिती नियमांचे दर्शन प्रेरणाकारी आहे. यातून सामाजाचे संघटन, नितीमूल्य घडून येवू शकेल.

डॉ. माधवी खरात

माधवी खरात

SIGNATURE OF PRINCIPAL INVESTIGATOR

PRINCIPAL

SHRI SHAHU MANDIR MAHAVIDYALAYA PUNE-9.